सुधारित राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता प्राप्त असलेल्या अनुदानातून क्षयरुग्णांसाठी आवश्यक असलेल्या औषधींवर वेष्टनांच्या (९९ DOTs Envelopes) खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०२१९/प्र.क्र.१२५/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २७ मार्च, २०१९.

वाचा :-

सहसंचालक, आरोग्य सेवा (क्षयरोग व कुष्ठरोग), पुणे-६ यांच्याकडील पत्र क्र. ससंआसे/ कुष्ठ व क्षय/कक्ष औ.भांन/पीआयपी २०१८-१९/आरएनटीसीपी/प्रशामा/२३८०-८३, दिनांक १८ जानेवारी, २०१९.

प्रस्तावना :-

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता प्राप्त असलेल्या अनुदानातून क्षयरुग्णांसाठी आवश्यक असलेल्या औषधींवर वेष्टनांच्या (९९ DOTs Envelopes) खरेदीस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ या वर्षाकरीता पीआयापी मध्ये मान्यता प्राप्त झालेली असून FMR Code ६.५.२ अंतर्गत Procurement of sleeves & Drugs boxes या बाबीखाली रु.३२४.८६ लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर उपलब्ध अनुदानातून सहसंचालक, आरोग्य सेवा (क्षयरोग व कुष्ठरोग), पुणे-६ यांच्या प्रस्तावानूसार क्षयरुग्णांसाठी आवश्यक असलेल्या औषधांवर वेष्टन घालण्यासाठी रक्कम रु.१८३.६५ लक्ष इतक्या रकमेची वेष्टन खरेदी करणेकरीता पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

प्रपत्र-१ अनुदानाचा तपशिल

Sr. No.	Item	FMR Code 2018-19	Particulars	PIP Approved RS. (In Lakhs) 2018-19	Procurement proposal Rs. (In Lakhs)
1	क्षयरुग्णांसाठी आवश्यक असलेल्या औषधींवर घालण्यासाठीचे वेष्टनांची खरेदीबाबत (99 DOTs Envelopes/ Sleeves)	5.6.2	Procurment of sleeves & Drugs boxes	324.86	183.65

प्रपत्र-२ खरेदी प्रस्ताव

Sr. No	Name of the Material	Approx. Cost In Rs.	Total Quantity Nos.	Total Procurement Amt. In Rs.
1	Sleeves/Envolope **Lupin Co. IP**	7.5	594345	4457587.50
2	Sleeves/Envolope **Lupin Co. CP**	7.5	479903	3599272.50
3	Sleeves/Envolope **Macleods Co. IP**	7.5	254719	1910392.50
4	Sleeves/Envolope **Macleods Co. CP**	7.5	1119774	8398305.00
	Total			**18365557.50**

उपरोक्त प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर बाबींची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू बाबींचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियान मंजूर सन २०१८-१९ नुसार पीआयपी मध्ये उपलब्ध असलेल्या FMR Code ६.५.२ नूसार उपलब्ध रु.३२४.८६ लक्ष अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903251648567417 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.27 11:42:23 +05'30'

(निलेश फाळके)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)